॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)

## आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

## Department of Lifelong Learning & Extension

जा.क्र. कबचौउमवि/१९ /आ.अ.व वि.वि./अभ्यासक्रम मा./ १०५/२०२३ दि.२०/११/२०२३

**प्रति,**
**मा.प्राचार्य,**
**आर.सी.पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय,**
**शिरपूर जि.धुळे**

**विषय :- प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देणेबाबत**
**संदर्भ :-** आपले पत्र जा.क्र.आरसीपीबीएड/३१/२०२३, दि.१४/०९/२०२३

महोदय/महोदया,

वरील विषय व संदर्भीय पत्रानुसार आपल्या संस्थेमार्फत प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी आपण आमच्या विभागाकडे परवानगी मागितली होती. त्यानुसार आजीवन अध्ययन व विस्तार मंडळासाठी मा.कुलगुरु महोदयांनी नियुक्त केलेल्या तज्ञ व्यक्तीचा अहवाल लक्षात घेऊन आपल्या प्रस्तावातील विविध अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

याबाबत आपणास कळविण्यात येते की, आपण मागणी केल्यानुसार आपल्या संस्थेस खालील प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | महाविद्यालय/ संस्थेचे नाव | परवानगी मागितलेला अभ्यासक्रम | संलग्नता शुल्क/प्रती शैक्षणिक वर्ष |
|---|---|---|---|
| १. | आर.सी.पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय शिरपूर जि.धुळे | **प्रमाणपत्र** (३ महिने) | |
| | | १) Professional Skill Development | रु.५००/- |
| | | २) Disaaster Management In School | रु.५००/- |

**शुल्क रचना (Fee Structure), शुल्क विभागणी, विद्यापीठात जमा करण्याची पध्दत:-**

संलग्नता शुल्क (Affiliation Fee) **(हे संपूर्ण शुल्क विद्यापीठात जमा केले जाईल)** प्रत्येक वर्षी संस्थेने हे शुल्क भरणे आवश्यक असेल.

संस्थेने आजीवन अध्ययन व विस्तार विभागाने दिलेल्या लिंकवर ऑनलाईन पध्दतीने शुल्क भरावयाचे आहे. व शुल्क भरल्याची पावती व विषयाचे नाव याबाबतची माहिती विभागाच्या ई.पत्यावर पाठवायची आहे. अभ्यासक्रमास मान्यता दिल्यानंतर पंधरा दिवसाच्या आत संलग्नता शुल्क (Affiliation Fee) ऑनलाईन भरायचे असून प्रत्यक्ष अभ्यासक्रम एक महिन्याच्या आत सुरु करावयाच्या आहे.

- शैक्षणिक शुल्क (Tuition Fee)
  यात दोन हिस्से होतील- (i) विद्यापीठ २५% व (ii) संस्था ७५%
- परीक्षा शुल्क (Examination Fee) :- प्रति विद्यार्थी जास्तीत जास्त रु.१००/- परीक्षा शुल्क म्हणून आपणास आकारता येईल.

- विद्यापीठाकडे योग्य ते शुल्क जमा झाल्याशिवाय परीक्षांचे आयोजन कुठल्याही केंद्रावर केले जाणार नाही.
- शैक्षणिक शुल्क (Tuition Fee) अभ्यासक्रमाचा कालावधी समाप्त होणेच्या आत संस्थेने आजीवन अध्ययन व विस्तार विभागाने दिलेल्या लिंकवर ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे आहे. तसेच शुल्क भरल्याची पावती व विषयाचे व प्रवेशित विद्यार्थ्यांच्या नावाची यादी व २५% शुल्काच्या रक्कमेसह नमुद करुन याबाबतची माहिती विभागाच्या ई.पत्यावर पाठवायची आहे. शैक्षणिक शुल्क विद्यापीठाकडे जमा केल्याशिवाय विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे दिली जाणार नाहीत.

**विशेष सूचना:-**

१) शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी आपण मागणी केलेल्या प्रत्येक अभ्यासक्रमासाठी जास्तीत जास्त ३० इतकी विद्यार्थी संख्या मंजूर करण्यात येत आहे.

२) आजीवन शिक्षण अभ्यासक्रमा अंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वतंत्र ओळखपत्र कोर्स सुरु झाल्यानंतर महिनाभरात उपलब्ध करुन द्यावे. **अशा विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या कोणत्याही योजनांचा लाभ मिळणार नाही**.

३) लेखी व प्रात्यक्षिक परीक्षेच्या स्वरुपानुसार प्रश्नपत्रिकांची गुणवत्ता राखणे व तपासुन घेणे ही संबंधित संस्थेची जबाबदारी असेल. त्यासाठी आवश्यकता भासल्यास संस्था कार्यकारी समितीस विनंती करु शकेल. (अ) लेखी परीक्षा (Theory) (ब) तोंडी परीक्षा (Oral) (क) प्रात्यक्षिक परीक्षा (Practical/Journals)

४) अंतर्गत परीक्षेचे पुरावे व दस्ताऐवज संबंधीत केंद्र प्रमुखाने किमान २ वर्षे सांभाळून ठेवावे.

५) काही कोर्सेसना गुणपत्रक व प्रमाणपत्र देण्यात येईल तर काही कोर्सेसना केवळ प्रमाणपत्र दिले जाईल.

६) अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर विहित परिक्षेनंतरच्या निकाल पत्रास मा.कुलगुरु महोदयांची मान्यता घेतली जाईल. मा.कुलगुरु महोदयांच्या मंजुरीनंतर प्रमाणपत्रावर मा.प्र-कुलगुरु व संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग यांची सही व शिक्का असेल.

७) ज्या कोर्सेसना गुणपत्रक देणार आहोत त्याचे लेजर ठेवणे आवश्यक आहे.

८) परिक्षेचे वेळापत्रक तसेच परिक्षा विषयक सर्वच बाबी वेळोवेळी पूरेशा आधी आजीवन अध्ययन व विस्तार विभागास कळविणे आपणास बंधनकारक असेल.

९) आपल्या संस्थेच्या अभ्यासक्रमा विषयी जाहिरात, बॅनर, पोस्टर याचा मसूदा आजीवन अध्ययन व विस्तार विभागाकडुन मंजूर करुन घ्यावा.

१०) प्रत्येक प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी स्वतंत्र वा सगळया प्रमाणपत्र अभ्यासक्रमांसाठी एका समन्वयकाची नेमणूक करणे अनिवार्य आहे. सदर समन्वयकाने विभागाच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रम व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये सामील होऊन वेळोवेळी दिलेल्या सुचना लक्षात घेणे आवश्यक आहे.

११) मान्यता मिळाल्यानंतर प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करणे शक्य नसल्यास त्याबाबत मान्यता पत्रापासून एक महिन्याचा आत ई-पत्राद्वारे कळविणे आवश्यक आहे.

१२) अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांचे दस्तऐवज त्यांच्या याद्या, अभ्यासक्रम अध्यापनाचे वेळापत्रक, विद्यार्थ्यांची अध्यापकांची हजेरी आदि आवश्यक संबंधित कागदपत्रांची तपासणी विभागाकडून केली जाईल. त्यामुळे ही कागदपत्रे व्यवस्थित सांभाळावी.

**आपला विश्वासू,**

**(प्रा.डॉ.आशुतोष र.पाटील)**
**संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग**

**Phone-0257-2257415/416**
**FAX-0257-2258403-406**
**वेबसाईट-nmu.ac.in**
**ई.मेल- directorllleb@nmu.ac.in**